# मुंबई विद्यापीठ

एएक्युए/आयसीडी/२०२०–२१/८२६

परिपत्रक:

विद्यापीठाचे विविध विभाग/केंद्र/संस्था येथील संचालक/विभागप्रमुख/समन्वयक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे उपकेंद्र, स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड अप्लाइड सायन्सेस, कल्याण, मुंबई विद्यापीठ ग्रंथपाल, संचालक विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय, अंबाडवे आणि विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध विभाग/संस्था/केंद्र व संचलित महाविद्यालयातील कार्यरत हंगामी/अस्थायी शिक्षकांची नेमणूक विद्यापीठ प्रशासनाच्या आदेशानुसार १ सप्टेंबर, २०२० पासून शैक्षणिक वर्ष २०२०–२१ संपेपर्यन्त अशी दर्शविण्यात आली आहे. शैक्षणिक वर्षाचा शाखानिहाय कालावधी विद्यापीठाचे परिपत्रक क्र. UG/40 of 2020-21 दिनांक 2nd August, 2020 नुसार प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (प्रत संलग्न)

तरी, याद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०–२१ करिता सदर हंगामी शिक्षकांची नियुक्ती दिनांक ३१ मे, २०२१ पर्यन्तच करण्यात आली आहे. तरी सदर बाब सर्व संबंधीत हंगामी शिक्षकांच्या निदर्शनास आणून देऊन त्याची नोंद घ्यावी. तद्नंतर विद्यापीठ प्रशासनाच्या पुर्व परवानगीशिवाय व AAQA विभागाच्या अधिकृत कार्यालयीन आदेशाशिवाय कोणीही विभागात/संस्थेत/महाविद्यालयात परस्पर हंगामी शिक्षकांची नेमणूक करू नये किंवा हंगामी शिक्षकांची सेवा सुरू ठेवू नये. तसे केल्यास ती बाब विद्यापीठ प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन समजण्यात येईल व त्या संबधित शिक्षकाच्या सेवासातत्येची/वेतनाबाबतची व इतर कोणतीही जबाबदारी विद्यापीठ प्रशासनाची राहणार नाही.

सदर नियुक्त करण्यात आलेल्या हंगामी शिक्षकांच्या नियुक्त्या दिनांक ३१ मे, २०२१ रोजी आपोआप संपुष्टात येतील, याची नोंद घ्यावी व सर्व संबंधीतांना त्याप्रमाणे अवगत करावे, ही विनंती.

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

दिनांक :- २३ मार्च, २०२१

प्रति,

विद्यापीठाचे विविध विभाग/केंद्र/संस्था येथील संचालक/विभागप्रमुख/समन्वयक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे उपकेंद्र, स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड अप्लाइड सायन्सेस, कल्याण, मुंबई विद्यापीठ ग्रंथपाल, संचालक विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे आणि विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, केंद्र.